# यावल महाविद्यालयात जागतिक दहशतवाद विषयावर व्याख्यान संपन्

यावल (प्रतिनिधी) येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सह.समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व आय. क्यू. ए. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दहशतवाद व्याख्यान ऑनलाइन आयोजित करण्यात आले. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक दहशतवाद कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री मनोज पाटील सर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, आजच्या दिवशी अमेरीकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवादी हल्ला झाला. त्यानिमित्त सदर कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक श्री.प्रशांत निंबाजीराव बागूल ( शिक्षक, श्रीमती हि.गो.श्रॉफ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय .नंदुरबार ) यांनी कार्यक्रमात जागतिक दहशतवाद आज अनेक राष्ट्रांसमोर असलेले मोठे आव्हान आहे. दहशतवादाची समस्या मानवतेसाठी भयानक संकट झालेले आहे असे मार्गदर्शन केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.शेखर चव्हाण सर यांनी जागतिक दहशतवाद विषयी वर्तमान स्थितीतील आपले विचार व्यक्त केले व जगात सर्व ठिकाणी दहशतवादाने जो धुमाकूळ घातलेला आहे त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्व जगाने एकत्रित येण्याची गरज आहे असे मत मांडले. ऑनलाईन कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी हजर होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ. एस. पी. कापडे व प्रा. एस. आर. गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन श्री. मनोज पाटील सर यांनी केले तसेच आभार श्री. प्रविण पाटील सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी उपप्राचार्य प्रा. एम डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, श्री.संजय पाटील सर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



दैनिक
जळगाव वृत्त

## यावल महाविद्यालयात जागतिक दहशतवाद विषयावर व्याख्यान संपन्न

यावल प्रतिनिधी



येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सह.समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व आय. क्यू. ए. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दहशतवाद व्याख्यान ऑनलाइन आयोजित करण्यात आले. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक दहशतवाद कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. मनोज पाटील सर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरीकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवादी हल्ला झाला होता त्यानिमित्ताने सदर कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक श्री.प्रशांत निंबाजीराव बागूल ( शिक्षक, श्रीमती हि.गो. श्रॉफ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय .नंदुरबार ) यांनी कार्यक्रमात जागतिक दहशतवाद आज अनेक राष्ट्रांसमोर असलेले मोठे आव्हान आहे. दहशतवादाची समस्या मानवतेसाठी भयानक संकट झालेले आहे असे मार्गदर्शन केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.शेखर चव्हाण सर यांनी जागतिक दहशतवाद विषयी वर्तमान स्थितीतील आपले विचार व्यक्त केले व जगात सर्व ठिकाणी दहशतवादाने जो धुमाकूळ घातलेला आहे त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्व जगाने एकत्रित येण्याची गरज आहे असे मत मांडले. ऑनलाईन कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ. एस. पी. कापडे व प्रा. एस. आर. गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन श्री. मनोज पाटील सर यांनी केले

तसेच आभार श्री. प्रविण पाटील सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी उपप्राचार्य प्रा. एम डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, श्री.संजय पाटील सर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## जागतिक दहशतवाद राष्ट्रांसमोर मोठे आव्हान - प्रशांत बागूल

देशोन्नती वृत्तसंकलन...

यावल ■ येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व आय. क्यू. ए. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दहशतवाद व्याख्यान ऑनलाइन आयोजित करण्यात आले. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक दहशतवाद कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मनोज पाटील यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवादी हल्ला झाला होता त्यानिमित्ताने सदर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रशांत निंबाजीराव बागूल यांनी कार्यक्रमात जागतिक दहशतवाद अनेक राष्ट्रांसमोर असलेले मोठे आव्हान आहे. दहशतवादाची समस्या मानवतेसाठी भयानक संकट झालेले आहे असे मार्गदर्शन केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष शेखर चव्हाण यांनी जागतिक दहशतवाद विषयी वर्तमान स्थितीतील आपले विचार व्यक्त केले व जगात सर्व ठिकाणी दहशतवादाने जो धुमाकूळ घातलेला आहे त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्व जगाने एकत्रित येण्याची गरज आहे असे मत मांडले. ऑनलाईन कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी हजर होते.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ. एस. पी. कापडे व प्रा. एस. आर. गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन मनोज पाटील यांनी केले तसेच आभार प्रविण पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी उपप्राचार्य प्रा. एम डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, संजय पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## रावेरमध्ये बेशिस्त वाहनचालकसह फळ विक्रेत्यांवर कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन... रावेर ■ शहरातील बेशिस्त वाहतुकीला लगाम लावण्यासाठी नव्याने रुजू झालेले पोलिस निरीक्षक कैलास नागरे यांनी कारवाईचा दंडुका उगारला. यावेळी ३६ बेशिस्त वाहनधारक, वाहतुकीला अडथळा निर्माण करणारे १६ फळ विक्रेते अशा एकूण ४२ जणांवर कारवाई केली. दरम्यान, कारवाई केलेल्या वाहन चालकांपैकी बहुतांश अल्पवयीन आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून अंकलेश्वर-बऱ्हाणपूर महामार्ग जातो. या चौकाच्या दक्षिणेला सर्व शासकीय कार्यालये, शासकीय व खासगी रुग्णालये, शाळा, बँका आहेत. उत्तरेला मुख्य बाजारपेठ व नागरी वस्ती आहे. यामुळे येथे नेहमी वर्दळ असून अपघाताच्या घटना अनेकवेळा घडल्या आहेत. मात्र, वाहनचालकांची बेफिकिरीमुळे येथेच वादाच्या घटना जास्त घडतात. याची दखल घेत पोलिस निरीक्षक नागरे यांनी कारवाईला सुरूवात केली.

निरीक्षक नागरे यांच्या नेतृत्वात प्रमुख रस्त्यांवरून पथसंचलन करण्यात आले. यानंतर डॉ.आंबेडकर चौकात ३६ बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई केली. ट्रिपल सीट वाहन चालवणे, हेल्मेट नसणे व नो-पार्किंगमध्ये वाहने उभी केल्याने दंड वसूल केला.

Mon, 13 September 2021
ePaper देशोन्नती https://deshonnati.digitaledition.in/c/63086036